**MHBH030022272022**

**परिशीष्ट – अ**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी भंडारा, न्यायालय क्र.२**

( पिठासिन अधिकारी एम. जी. हिंगणघाटे )

**महाराष्ट्र शासन वि. गणेश वानखेडे**

| | |
|---|---|
| **सं.फौ.प्र.क्र. १५३२/२०२२** | **नि.क्र.५ खाली.** |
| **अप.क्र. ८४/२०२२** | **पोलीस ठाणे– वरठी** |
| **–सरकारतर्फे–** | **–आरोपीतर्फे–** |
| **श्री. ए.सी. खुराना** | **श्री. आर.डी.कोलते** |

**परिशीष्ट – ब**

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | २६/०५/२०२२ |
| २. | गुन्हा दाखल तारीख | २६/०५/२०२२ |
| ३. | दोषारोप दाखल तारीख | १२/१०/२०२२ |
| ४. | दोषारोप ठेवल्याची तारीख | ०६/०७/२०२३ |
| ५. | संपरिक्षा चालु झाल्याची तारीख | १२/०७/२०२३ |
| ६. | निकालासाठी राखीव ठेवल्याची तारीख | ०१/०८/२०२३ |
| ७. | निकाल तारीख | ०१/०८/२०२३ |
| ८. | शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | नाही. |
| ९. | कालावधी | ०० व., ०९ म., १९ दि. |

**आरोपीचा तपशील**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | आरोपी अटक तारिख | आरोपीस जामीन दिल्याची तारिख | गुन्हा | आरोपीस शिक्षा दिली/निर्दोष मुक्तता | शिक्षा | आरोपी बंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विजय नारायण खोब्रागडे | २६/०५/२०२२ चे सूचनापत्र | ०६/०७/२०२३ | म.दा.का. कलम ६५ (ई) | निर्दोष | नाही | नाही. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by MRUNAL GAJENDRA HINGANGHATE
Date: 2023.08.03 16:58:23 +0530

## पुराव्याचा तपशील

| | |
|---|---|
| **सरकार तर्फे साक्षीदार –** | **सरकार तर्फे निशाणीकृत पुरावा–** |
| १. पंच साक्षीदार प्रभू रामलाल देशमुख (अ.सा.क्र.१) | १.सुचनापत्रावरील स्वाक्षरी (नि.क्र.६)<br>२. घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील स्वाक्षरी (नि.क्र.७ ते ९) |
| **आरोपी तर्फे साक्षीदार –** | **आरोपी तर्फे निशाणीकृत पुरावा–** |
| निरंक. | निरंक. |
| **न्यायालयातर्फे साक्षीदार –** | **न्यायालयाने निशाणीकृत केलेला पुरावा –** |
| निरंक. | निरंक. |

## –: न्या य नि र्ण य :–
## ( आज दिनांक ०१/०८/२०२३ रोजी )

आरोपी विजय नारायण खोब्रागडे यांच्या विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अंतर्गतची प्रस्तुत संपरीक्षा आहे.

**२.** अपराधाच्या तपशिलानुषंगाने आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने पंच साक्षदार क्रमांक १ प्रभू रामलाल देशमुख यांची साक्ष नोंदविली.

**३.** अभिलेखावर उपस्थित पुराव्यावरुन व कागदपत्रावरुन खालील मुद्दे न्यायनिर्णयाकरीता उद्भवले असून मी त्यावर सकारण निष्कर्ष नोंदविले आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १) दिनांक २६/०५/२०२२ रोजी १८.०० ते १८.३० वाजताचे सुमारास मौजा सातोना येथील आरोपीच्या राहत्या घरी आरोपी हा एका मातीच्या मडक्यात अंदाजे १५ लिटर मोहाफुलाची हातभट्टी दारु व इतर साहित्य बेकायदेशीर विक्री करण्याच्या उद्देशाने विना परवाना अवैधरित्या बाळगून मिळून आला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |

Digitally signed by MRUNAL GAJENDRA HINGANGHATE
Date: 2023.08.03 16:58:28 +0530

२) आदेश काय ? आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ च्या अनुषंगाने**:–

४. अभियोग पक्षाच्या वतीने तपासण्यात आलेले पंच साक्षदार क्रमांक १ प्रभू रामलाल देशमुख यांनी त्यांच्या साक्षेत त्यांना पोलीसांनी पंच म्हणून न बोलाविल्याचे कथन केले. तसेच त्यांच्यासमक्ष कोणतीही जप्तीची कार्यवाही न केल्याचे कथन केले. सुचनापत्र, घटनास्थळ पंचनामा व जप्ती पत्रकावरील त्यांच्या सह्या सदर पंचांनी ओळखल्या. मात्र त्यातील मजकुराबाबत अज्ञान दर्शविले. त्यामुळे सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारले, परंतु त्यात सुध्दा अभियोग पक्षास सहायक ठरेल इतपत पुरावा अभिलेखावर आला नाही.

५. खटल्यातील इतर साक्षीदारांना समन्स काढून देखील ते पुराव्याकामी हजर झाले नाही. सदर प्रकरणात रासायनिक परीक्षणाचा अहवाल अभिलेखावर दाखल असला तरी जप्त मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त केल्याबाबतचा पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे तो मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त केल्याचे सिध्द होत नाही. तसेच नमुना विहीत पध्दतीने घेतल्याबाबत साक्षीदाराच्या साक्षेतुन दिसुन येत नाही. प्रकरण हे संक्षीप्त स्वरुपाचे आहे. अशा परिस्थीतीत आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेल्या गुन्हयाचे तात्वीक अंग अभियोग पक्ष पुराव्या अभावी सिध्द करु शकला नाही. सबब मी मुद्दा क्रमांक १ ला नकारार्थी निष्कर्ष नोदंविला आहे.

Digitally signed by MRUNAL GAJENDRA HINGANGHATE
Date: 2023.08.03 16:58:33 +0530

**मुद्दा क्रमांक २ च्या अनुषंगानेः–**

६. मुद्दा क्रमांक १ ला नोंदविण्यात आलेल्या निष्कर्षाच्या अनुषंगाने, आरोपीविरुध्द लावण्यात आलेले आरोप संशयापलीकडे सिध्द न झाल्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) आरोपी विजय नारायण खोब्रागडे यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) च्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचा वैयक्तीक व जमानत बंधपत्र रद्द करण्यात येतो.

३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहीताचे कलम ४३७ (अ) नुसार पुर्तता करावी.

४) मामल्यात जप्त मुद्देमाल निरुपयोगी व टाकाऊ असल्यामुळे आवाहनाच्या कालावधी नंतर नष्ट करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला).

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MRUNAL GAJENDRA HINGANGHATE
Date: 2023.08.03 16:58:38 +0530

**(श्रीमती एम. जी. हिंगणघाटे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
(न्याया. क्रमांक २),**<u>भंडारा</u>**.

दिनांकः ०१/०८/२०२३
ठिकाणः भंडारा.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | L. K. Dhakate |
| Name of the Court | : | M. G. Hinganghate, 2nd Jt. J.M.F.C., Bhandara. |
| Date of Judgment | : | 01/08/2023 |
| Judgment signed by the presiding officer on | : | 01/08/2023 |
| Judgment uploaded on | : | 03/08/2023 |